# सातारा जिल्हा परिषद, सातारा

**ग्रामपंचायत विभाग चौथा मजला**

कार्यालय दुरध्वनीः- (०२१६२)२३३८४३ Email –vptzpsatara2@yahoo.in

जा.क्र.ग्रापं/आस्था-२(१)(२)/कावि-२६५० /२०२०

दिनांक : २५ : ०२ : २०२०.

प्रति,

सोबतचे यादीतील उमेदवार.

विषय :- मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी उपस्थित राहणेबाबत..

वरील विषयानुसार तुम्हांस कळविण्यात येते की,अनुसूचित जमाती विशेष भरती मोहिम सन २०२० अंतर्गत कंत्राटी ग्रामसेवक या पदासाठी दिनांक २२/०१/२०२० रोजी सकाळी ११.०० ते १२.३० या वेळेत घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेमध्ये तुम्ही गुणवत्तेनुसार, मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसाठी पात्र ठरलेला आहात. तरी तुम्ही शुक्रवार वार दिनांक २८/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद सातारा येथे मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित राहण्याचे आहे. मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी येताना खालील प्रमाणे मूळ कागदपत्रे व खालील क्रमानुसार कागदपत्रांच्या सत्यप्रती २ प्रतीत घेवुन उपस्थित राहणेचे आहे.

१. अर्जामध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हतेची गुणपत्रके व प्रमाणपत्रे.
२. संगणक परिक्षा उत्तीर्ण असलेबाबतचे प्रमाणपत्र
३. जाहिरातीप्रमाणे आवश्यकतेनुसार सदर पदासाठी असलेल्या अनुभवाचे प्रमाणपत्र.
४. समांतर आरक्षणाबाबतीत सक्षम प्राधिकारी यांचा दाखला,प्रमाणपत्र (खेळाडू/प्रकल्पग्रस्त/माजी सैनिक/दिव्यांग).
५. जन्मतारखेचा पुरावा दर्शविणारी कागदपत्रे.
६. सक्षम प्राधिकारी यांचा जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र.
७. महाराष्ट्र राज्यातील अधिवासी असल्याचा दाखला (डोमासाईल)
८. शासकीय कर्मचारी असल्यास, सदर पदासाठी अर्ज करण्यास परवानगी दिलेले पत्र.
९. सेवायोजन कार्यालयाकडील नोंदणी प्रमाणपत्र.
१०. दिव्यांग असल्यास सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र.
११. स्वतःचे फोटो असलेले आयडी प्रूफ व आधारकार्ड.
१२. लहान कुटुंबाचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र.
१३. नावात बदल असल्यास गॅझेट (राजपत्र) व पुरावा.

तरी वरील अ.क्र. १ ते १२ मधील मूळ कागदपत्रांसह व सदर कागदपत्रांच्या २ सत्यप्रतींसह वरील वेळेत सोबतचे यादीप्रमाणे उमेदवारांनी उपस्थित रहावे. तुम्ही मूळ कागदपत्र पडताळणीसाठी दि.२८/०२/२०२० रोजी अनुपस्थित राहिल्यास तुमचा कंत्राटी ग्रामसेवक पदासाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद,करिता.